# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—३०/०९/२०१६

**१) संगनमत करुन गौन खनिज भरून ३ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०९/२०१६ रोजी २२.३० ते २४.०० वा. दर. यातील तामसवाडी वैनगंगा नदीपात्रातील रेतीघाटात आरोपीतांनी संगनमत करुन १ पोकलॅड मशिनने टिप्पर क्र. एमएच ३६ ई २९०३, ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल १३९४, ट्रॉली क्र. एमएच ३६ जी ०८२९, ट्रक क्र. एमएच ३६ एफ २९०४ मध्ये चालक व मालक यांनी संगनमत करुन सुर्यास्था नंतर रेती घाट नदीपात्रात पोकलॅड मशिनने गौन खनिज भरुन ३ ब्रास रेती कि. १२,०००/—रु. ची रेतीचा उपसा करुन टिप्पर, ट्रक मध्ये गौन खनिज भरुन चोरुन नेतांनी मिळुन आल्याने व ट्रक क्र. एमएच ३६ एफ २९०४ हा रेतीने भरलेला पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. शेटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,१०९,१८८,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. श्रीवास पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक २९/०९/२०१६ रोजी ०८.३० वा. दरम्यान. यातील पाचही आरोपीतांच्या नातलगांनी फिर्यादीच्या मुलाचे मर्डर केले होते त्या कारणा वरुन आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीच्या घरासमोर रोडवर येवुन तीला घरातुन ओढुन बाहेर आणा तीच्या मुलाचा जसा मर्डर केला तसा करु असे बोलुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन धमकी दिली. असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १४३,२९४,५०६ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगी वस्तीगृहातुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०९/२०१६ ते २९/०९/२०१६ पर्यत. यातील फिर्यादीचे वस्तीगृहात राहणारी अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष, ही घरी जाते म्हणुन वस्तीगृहातुन निघुन गेली परंतु ती आज पावेतो घरी पोहचली नाही. तीचा शोध घेतला असता ती मिळुन न आल्याने मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलच्या लापरवाहीमुळे, दोन चिमुरडे जखमी . :—**

दिनांक २८/०९/०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी भगवंत सिताराम गुरणुले वय ४२ वर्ष, रा. बेलघाटा वार्ड पवनी यांचा मुलगा अविनाश गुरणुले वय १३ वर्ष व घरा शेजारील मुलगा कार्तीक माधव बावणकर वय १० वर्ष, असे दोघेही हे ७ ते ८ मुलांसह गणपती विर्सजन करुन घराकडे हातगाडी घेवुन परत येत असतांना निलज फाटयाकडुन पवनी कडे येणा—या हिरो होंडा मोटार सायकल आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन वरील दोन्ही मुलास मच्छी सोसायटी कार्यालया समोर निलज ते भंडारा रोड पवनी येथे धडक मारुन त्यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक २९/०९/०१६ रोजी २१.०० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच ४० वाय ९८९१ चा चालकाने दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून सर तर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयांवर धाडी .** :—

दिनांक २९/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, सिहोरा, गोबरवाही, व पवनी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ११२ लिटर हातभट्टी दारु कि. ६,३००/—रु. व १ लिटर ६२० मिली लिटर देशी दारु कि. ४५०/—रु. असा एकुण कि. ६,७५० /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई.** :—

दिनांक २९/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५८ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ५२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**(के.एच.धात्रक)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

३०/९/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.